नि. क्र. 177

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव महाराष्ट्र वन विभाग
दूरध्वनीक्र.022-25220097
EmailId:dfommcu@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वनविभाग
**विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक**
**यांचे कार्यालय**
ब- ६८, कामगार नगर, टिळकनगर स्टेशन जवळ, कुर्ला (पुर्व), मुंबई - ४०० ०२४

---

जा.क्र.कक्ष-9/जमिन/ 1891 /सन 2022-23 दिनांक. 27 / 10/2022.

प्रति,

सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.

**विषय :** मौजे नवघर (कणाकिया) ता. जि. ठाणे येथील सर्वे क्र. 271, 273, 263 नवीन स.नं.82,83,80 या जागेवर कांदळवनापासुन 50 मी. परिसरात कांदळवनाची बेसुमार कत्तल होत असलेबाबत. श्री. अमजद खान (तक्रार क्र.177)

**संदर्भ :** 1. आपलेकडील पत्र क्र.ल.ले/समिती/16, दिनांक.07/04/2022.
2. वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांच्याकडील पत्र क्र. ठा.कां/तक्रार/534, दिनांक.10/10/2022.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये श्री. अमजद खान यांनी मौजे नवघर (कणाकिया) ता. जि. ठाणे येथील सर्वे क्र. 271, 273, 263 नवीन स.नं.82, 83, 80 या जागेवर कांदळवनापासुन 50 मी. परिसरात कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करुन त्यावर विकासक / भुमाफिया यांनी अनधिकृतरित्या झोपडपट्टी बांधली असुन, कांदळवनालगत पत्र्याचे कुंपण करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबतची तक्रार अर्ज आपल्यामार्फत या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांनी नमूद जागेची स्थळपाहणी करून संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

1. सदरचे ठिकाण हे मौजे नवघर (कणाकिया) ता. जि. ठाणे येथील सर्वे क्र. 271, 273, 263 नवीन स.नं. 82, 83, 80 येथील आहे.
2. तक्रारीमधील नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही.
3. तक्रारीमधील नमूद क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत नाही.
4. प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या वेळी प्रत्यक्ष जागेवर घेतलेले जी.पी.एस. रिडींग खालीलप्रमाणे
   N 19 17 52 E 72 52 41
5. वरील जी.पी.एस. रिडींग गुगल अर्थवर घेऊन MRSAC नकाशावर सुपर इंम्पोज करुन तपासले असता सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही.
6. सदर सर्वे क्रमांकाच्या परिसरात कोणत्याही प्रकारची कांदळवनाची किंवा कांदळवन सहयोगी झाडे दिसुन आली नाहीत. त्यामुळे या विभागाकडील सदरची तक्रार निकाली काढण्यात यावी, हि विनंती.

(स्वाक्षरी) 27/10/22
(एम.आदर्श रेड्डी)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्र. : 2576 दिनांक : 02/11/22
मुख्य लेखापाल
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
Mangrove Committee

प्रतिलिपी — मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,कांदळवन कक्ष,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी — सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

3/11

**वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन) मुंबई कांदळवन संधारण घटक, यांचे कार्यालय**
वनराज सोसा.शेजारी,फॉरेस्ट कॉलनी, हरी ओम नगर रोड,कोपरी, ठाणे (पुर्व)- 400 603
Email:rfommcubhiwandi@gmail.com

जा. क्र./ ठा.कां/तक्रार/ 534/2022-23
ठाणे 400 603, दि. 10/10/2022

प्रति,

मा.विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक

विषय:-श्री. अमजद खान यांचेकडील दिनांक 13/12/2021 रोजीची तक्रार. (तक्रार क्र. 177)
संदर्भ-वनपाल ठाणे यांचेकडील पत्र क्र. व.ठा./90/2021-22, दि. 11/02/2022.
उपरोक्त विषयान्वये प्राप्त तक्रारी अर्जाचे अहवाल खालील दिलेल्या नमुन्यात सादर करीत आहोत.

**तक्रारी अर्जाबाबत पाहणी केल्याचा अहवाल**

1. मुळ तक्रारदाराचे नाव व पत्ता, फोन नं.- श्री. अमजद खान, व्यवस्थापकीय संचालक, वसुंधरा संवर्धन ट्रस्ट, पत्ता- ॲड. राजेश दाभोळकर, 2/34, कलावती भवन, शांतीलाल कंपाऊंड, जवाहर नगर, खार पू. मुंबई 400 055, मो.क्र. 9076788694

2.स्थळाचे वर्णन—: मौजे नवघर स.क्र. 271, 273, 263 नवीन स.क्र. 82, 83, 80
तसेच कनाकिया रोड, "घर हो तो ऐसा" रश्मी बिल्डर साईट.

3. तक्रारीचा तपशील:- उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवनाचा ऱ्हास झालेबाबत श्री. अमजद खान यांनी केलेल्या तक्रारीबाबत अहवाल सोबत जोडून सादर करीत आहे.

4. स्थळाचे जी.पी.एस.रिडींग:-
   1. 19° 17' 52 " N व 72° 52' 41" E

5. Geo tag Photo- सहपत्रामध्ये जोडले आहे.
6. स्थळपंचनामा- सहपत्रामध्ये जोडले आहे.होय
7. क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र आहे का?- नाही. तसेच सदर क्षेत्र ५० मीटरच्या बाहेर आहे.
8. सरकारी क्षेत्र आहे का?- नाही.
9. खाजगी कांदळवन क्षेत्र आहे का?- नाही.
10. सी.आ.झेड क्षेत्राचा उल्लेख एम.आर.सॅक. नुसार काय आहे?
    सदरचे ठिकाणचा सी.आर.झेड क्षेत्राचा नकाशा या कार्यालयात उपलब्ध नाही. यामुळे सदर ठिकाण सी.आर.झेड क्षेत्रामध्ये येते का याबाबत बोध होत नाही. -
11. अधिसुचना क्रमांक व क्षेत्र-निरंक
12. 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नूसार तक्रारीतील नमुद जागेवर कांदळवन होते का?- नाही.
    31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नूसार तक्रारीतील नमुद शेतीजमीन असल्याचे दिसून येत आहे.
13. सद्या नमुद जागेवर कांदळवन आहे किंवा कसे या बाबत सुष्टष्ट अभिप्राय —
    सद्यस्थीतीत नमुद जागेवर कांदळवन नाही. सदर जागेवरती मातीची भरणी करून इमारत बांधण्याचे काम चालु असून त्या बाजुला बगीचा तयार करून "रश्मी बिल्डर घर है तो ऐसा" असे फलक लावण्याचे दिसून येते.
14. निर्ष्कषः- (कोणी कार्यवाही करणे आवश्यक आहे.)अधिसुचित क्षेत्र असल्यास प्रथम गुन्हा रिपोर्ट नोंदविला आहे का? नाही. सदर क्षेत्र अधिसुचित नाही.

15. खाजगी क्षेत्र असल्यास कोणी कारवाई करावी ? याबाबत त्यांचे पत्र दिले आहे का? — नाही.
सदर क्षेत्र खाजगी मालकीचे आहे.

16. वनक्षेत्रपाल यांचा चौकशीचे अभीप्राय सदरची तक्रार निकाली काढावी किंवा कसे ? याबाबत अभिप्राय.
सदर ठिकाणी 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नूसार तक्रारीतील नमुद शेतीजमीन असल्याचे दिसून येत आहे. या सर्वे क्रमांकामध्ये सद्यस्थितीत जागेवर मातीची भरणी करून इमारत बांधण्याचे काम चालू असून त्या बाजूला बगीचा तयार करून "रश्मी बिल्डर घर है तो ऐसा"असं फलक लावलेला दिसून आला. या सर्वे क्रमांकाच्या परिसरात कोणत्याही प्रकारची कांदळवनाची किंवा कांदळवन सहयोगी झाडे दिसून आली नाहीत. तरी सदरची तक्रार निकाली काढण्यास कोणतीही हरकती नाही.

(विक्रांत वामन खाडे)
वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन),
मुंबई कांदळवन संधारण घटक